सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र.पोमसं/३६/र.वका.(८३००)शा.नि.-अधिसूचना/०१/२०२६, मुंबई, दि. ई.स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ** :- महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक-संकीर्ण-३६२५/प्र.क्र.७६/ ई-११०६१९६/पोल-३, दि. २८/०४/२०२६.

**विषय** :- "राज्यात वन नेशन वन ई-चलान प्रकल्प् राबविण्यासाठी प्रशासकीय मान्यता देण्याबाबत".

****

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण--३६२५/प्र.क्र.७६/ ई-११०६१९६/पोल-३, दि. २८/०४/२०२६. ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२६०४२८१९२२०५०४२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Digitally signed by
CHANDRASHEKHAR GOVINDRAO SHINDE
Date: 04-05-2026 17:00:50

( चंद्रशेखर शिंदे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व.का) (अति.कार्यभार )
पोलीस महासंचालक राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,
अपर पोलीस महासंचालक, (वाहतुक) महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत :-
पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके “लेखा" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

"राज्यात वन नेशन वन ई-चलान प्रकल्प राबविण्यासाठी प्रशासकीय मान्यता देणेबाबत."

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-३६२५/प्र.क्र.७६/ई-११०६१९६/पोल-३**
गृह विभाग, दुसरा मजला,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २८ एप्रिल, २०२६.

**वाचा :-**

१. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.सीओएम-१०९८/प्र.क्र.२१२/९८/३९, दि.५.१०.२००१, दि. ५.१०.२००२, दि. ५.११.२००२, दि. ५.८.२००५.
२. शासन निर्णय, गृह विभाग क्र. गृहआ-२०१५/प्र.क्र.२३०/आस्थापना-२, दि.२०.५.२०१५.
३. शासन निर्णय, गृह विभाग क्र. संकीर्ण-२०१५/प्र.क्र.६४/विशा-३(अ), दि.१८.६.२०१५, दि.२.६.२०१६, दि.२२.३.२०१७, दि.२०.७.२०१७ व दि.४.८.२०१७
४. मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या दि.१०.११.२०१६ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.
५. शासन निर्णय, गृह विभाग क्र. सीसीटी-३६१७/प्र.क्र.२/पोल-३, दि.५.६.२०१७, दि.३.२.२०१८, व दि. १२.११.२०१८.
६. अपर पोलीस महासंचालक (नि.व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. डीजीपी-डी-२४/२४३/डेस्क-२४,ई.कॉम्प्यु.१६०९३२. दि.१२.२.२०२५
७. अपर पोलीस महासंचालक (वाहतूक), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. अपोमसं (वा)/ ४५/ नियोजन /ई-चलान/एनआयसी सुधारीत प्रस्ताव/४१०३/२०२५, दि.१७.९.२०२५.
८. शासन निर्णय, गृह विभाग क्र.सीसीटी ३६१७/प्र.क्र.२/भाग-२/१२४६२५८/पोल-३, दि.२२.९.२०२५.
९. अपर पोलीस महासंचालक (वाहतूक), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. अपोमसं(वा)/४५ / नियोजन /ई-चलान/एनआयसी सुधारीत प्रस्ताव/४७९/२०२६, दि.१०.२.२०२६.
१०. अपर मुख्य सचिव (गृह) यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या दि.१३.४.२०२६ रोजीच्या बैठकीचे समक्रमांकाचे इतिवृत्त पत्र दि.२२.४.२०२६.

**प्रस्तावना :**

शासन निर्णय, गृह विभाग दि.२.६.२०१६ अन्वये अपर मुख्य सचिव (गृह) यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीची पुनर्रचना करण्यात आली. तसेच शासन निर्णय, गृह विभाग दि.२२.३.२०१७ अन्वये उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या कार्यकक्षामध्ये गृह विभागातील सर्व तंत्रज्ञान विषयक प्रकल्पांचा समावेश करण्यात आला आहे.

२. राज्यातील वाहनांची संख्या, दिवसेंदिवस वाढत असून त्यामुळे वाहतूक कोंडी व इतर समस्या निर्माण होत आहेत. वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांकडून दंड वसूली दरम्यान वाहतूक पोलीस कर्मचारी/अधिकारी यांना अडचणींना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे वाहतूक समस्यांवर अंकुश ठेवणे व

कसूरदार व्यक्तींवर प्रभावी तथा पारदर्शकपणे कारवाई करण्यासाठी राज्यात “वन नेशन वन ई-चलान” प्रकल्प राबविण्यास व त्यासाठी येणाऱ्या रु.१९,३५,१६,२३६/- इतक्या खर्चाचा सविस्तर प्रकल्प अहवाल/आरएफपी प्रस्ताव अपर पोलीस महासंचालक (नि. व स.) यांनी दि.१२.२.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे शासनास सादर केला आहे. सदर आरएफपी प्रस्ताव तांत्रिक मान्यतेसाठी माहिती व तंत्रज्ञान विभागाकडे पाठविण्यात आला होता. त्यावर माहिती तंत्रज्ञान विभागाने दिलेले अभिप्राय गृह विभागाच्या दि.९.६.२०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले होते. त्यावर अपर पोलीस महासंचालक (वाहतूक) यांचे कार्यालयाच्या दि.१७.९.२०२५ रोजीच्या पत्रान्वये माहिती तंत्रज्ञान विभागाच्या अभिप्रायातील मुद्यांची पुर्तता करुन त्रुटीबाबतचा अहवाल शासनास पाठविला. सदर अहवाल पुन्हा माहिती व तंत्रज्ञान विभागास गृह विभागाकडून सादर केला. त्यास अनुलक्षून माहिती व तंत्रज्ञान विभागाचे दिलेले अभिप्राय दि.६.१.२०२६ रोजीच्या पत्रान्वये पोलीस महासंचालक कार्यालयास कळविले. यावर अपर पोलीस महासंचालक कार्यालयाकडून दि.१०.२.२०२६ रोजीच्या पत्राद्वारे एन.आय.सी. वन नेशन वन ई-चलान प्रकल्पासाठी प्रशासकीय मान्यता मिळणेबाबतच्या प्रस्तावातील त्रुटींची पूर्तता करुन पुन: प्रस्ताव शासनास सादर केला. याबाबत माहिती तंत्रज्ञान विभागाने दि.८.३.२०२६ रोजी नोट-५३ ते ५५ द्वारे प्रस्तावास तांत्रिक मान्यता दिली. प्रस्तुत तांत्रिक मान्यता मिळाल्यानंतर अ.मु.स. (गृह) यांच्या अध्यक्षतेखाली दि.१३.४.२०२६ रोजीच्या उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समिती (HPC) च्या बैठकीत एन.आय.सी. वन नेशन वन ई-चलान प्रकल्पासाठी प्रशासकीय मान्यता मिळणेबाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली. त्यानुसार प्रशासकीय मान्यतेचे आदेश निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

अपर मुख्य सचिव (गृह) यांचे अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या दिनांक १३.४.२०२६ रोजीच्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार राज्यात “वन नेशन वन ई-चलान” प्रकल्प राबविण्यास व त्यासाठी येणाऱ्या रु.१९,३५,१६,२३६/- (अक्षरी रुपये एकोणीस कोटी पस्तीस लाख सोळा हजार दोनशे छत्तीस फक्त) जीएसटीसह इतक्या खर्चास” या शासन निर्णयाद्वारे प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर प्रकल्पाची अंमलबजावणी व देखरेख करण्याची कार्यवाही अपर पोलीस महासंचालक (वाहतूक), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अध्यक्षतेखालील समितीमार्फत करण्यात यावी. सदर समितीने प्रकल्पाच्या कामकाजाचा वेळोवेळी आढावा घ्यावा.

३. प्रस्तुत प्रकरणी होणारा खर्च हा “मागणी क्र.१, २०५५- पोलीस (०१) (०६), ई-चलान प्रकल्प (कार्यक्रम) (२०५५ ए२८४), ५२ यंत्रसामुग्री व साधनसामुग्री” या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो त्या-त्या वित्तीय वर्षासाठी उपलब्ध असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

४. सदर निधी आहरित करण्यासाठी अपर पोलीस महासंचालक (वाहतुक), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना “नियंत्रण अधिकारी” व त्यांच्या अधिनस्त आहरण व संवितरण अधिकाऱ्याला “आहरण व संवितरण अधिकारी” म्हणुन घोषीत करण्यात आले आहे.

५. सदर शासन निर्णय माहिती तंत्रज्ञान विभागाने दिलेल्या तांत्रिक मान्यतेला अनुसरुन उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या दि.१३.४.२०२६ रोजीच्या बैठकीतील निर्णयानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला आला असून त्याचा संकेतांक २०२६०४२८१९२२०५०४२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RAJENDRA TANAJI BHALWANE

Digitally signed by RAJENDRA TANAJI BHALWANE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT, 2.5.4.20=38d121bf4a170d16dacf98520f0ac44551976931d2758148ccaa24d1fb27b9df, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=BADFC0DAA40CC485400AAD9CEABCD514095659A6CDFAC856815518DCD188C23A, cn=RAJENDRA TANAJI BHALWANE
Date: 2026.04.29 12:40:26 +05'30'

**( रा. ता. भालवणे )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे अ.मु.स., महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
३. मा.उप मुख्यमंत्री यांचे सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
४. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
५. अपर मुख्य सचिव (गृह),गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. अपर मुख्य सचिव (वित्त),वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. प्रधान सचिव (विशेष), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. प्रधान सचिव, माहिती व तंत्रज्ञान, मंत्रालय, मुंबई.
१०. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
११. अपर पोलीस महासंचालक (वाहतूक), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१२. सह पोलीस आयुक्त (वाहतूक), पोलीस आयुक्त कार्यालय, मुंबई.
१३. संचालक (माहिती तंत्रज्ञान), महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
१४. महासंचालक, राष्ट्रीय माहिती केंद्र (NIC), गणेशखिंड रोड,आय.सी.एस.कॉलनी, अशोकनगर, पुणे-४११००७.
१५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र १ / २ , मुंबई/नागपूर.
१६. अधिदान व लेखा अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१७. निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई.
१८. वित्त विभाग (व्यय-७ / वित्तीय सुधारणा) मंत्रालय, मुंबई.
१९. उपसचिव (पोल-८ / अर्थसंकल्प शाखा) गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
२०. निवडनस्ती पोल-३.